Water (Irrigation) NOC

IRRIGATION WATER-NOC

(58)

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ

मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे

सिंचन भवन, मंगळवार पेठ, बारणे रोड, पुणे - ४११०११

कार्यालय (०२०) २६१२२५०५ / २६१२५०७४ फॅक्स (०२०) २६१२६२१०

जा.क्र.मुअ(जसं)/(०९/२०१८)/प्रशा-८/ No 05387 दिनांक : 26 NOV 2018

ज्ञापन :

विषय : आयवेन टाऊनशिप फेज २ व ३ मौजे जांबे, नेरे व मारुंजी ता.मुळशी जि.पुणे येथील "विशेष नगर वसाहती" मधील लोकांना पिण्यासाठी पवना जलाशयातून बिगर सिंचन पाणी आरक्षणच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत.

WATER-NOC

संदर्भ : १) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१५/(४४/१५)/सिंव्य(धो), दि.१७.११.
२) शासन निर्णय क्रमांक बिसिंआ-२०१८/(२८१/१८)/सिंव्य(धो), दि.१२.१
३) मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे यांचे ज्ञापन क्र. मुअ/क /७०६७, दि.२५.१०.२००७
४) मा.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे पत्र क्रमांक मकृखोविम /३७/(१५१/२०१८)/सिंव्य-१/१२१६, दि.१६.०३.२०१८
५) मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे पत्र जा.क्र.मुअ(जसं)/(०२/२०१८)/प्रशा-८ /१०५५, दि.०२.०३.२०१८
६) अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांचे पत्र जा.क्र.पुपाम/बिसिमशा/११२५, दि.१५.०२.२०१८
७) मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे पत्र जा.क्र.मुअ(जसं)/प्रशा-८/५००७, दि.१२.११.२०१८ व अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांचे पत्र जा.क्र.पुपाम/ बिसिमशा/१०७४५, दि.१६.१०.२०१८

आयवेन टाऊनशिप फेज २ व ३ मौजे जांबे, नेरे व मारुंजी ता.मुळशी जि.पुणे या संस्थेने "विशेष नगरवसाहतीकरीता" पिण्यासाठी २.०२१९ दलघमी वाढीव बिगर सिंचन आरक्षणाची मागणी खालीलप्रमाणे केली आहे.

अ.क्र.	प्रयोजन	एकुण मागणी	पुर्वी मंजूर	वाढीव मागणी
१	पिण्यासाठी	३.३३५९	१.३१४०	२.०२१९

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम २०११ यातील कलम ५ मधील १६ (क) (१) नुसार जलसंपत्ती प्रकल्पामधील पाण्याचे क्षेत्रीय वाटप राज्य मंत्रीमंडळ स्तरावरुन करण्याची तरतुद करण्यांत आली आहे. त्या तरतुदीनुसार संदर्भीय शासन निर्णय क्र.१ अन्वये, राज्यातील पाटबंधारे प्रकल्पातून पिण्यासाठी १५% व औद्योगिकसाठी १०% व सिंचनासाठी ७५% प्रमाणे क्षेत्रिय वाटप राज्य मंत्रीमंडळाने निर्धारित केले आहे.

संदर्भीय शासन निर्णय क्र.१ अन्वये, बिगर सिंचन आरक्षण प्रस्तावाना मंजूरी देण्यासाठी क्षेत्रीय वाटपाच्या मर्यादेनुसार सुधारित स्तर निश्चित करण्यांत आलेला आहे. त्या निर्णयानुसार सदर प्रस्ताव शासन निर्णयामधील परिच्छेद २.३ मधील तरतुदीनुसार मा.मंत्रीमंडळ उपसमिती यांच्या मान्यतेनुसार संदर्भ क्र.२ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यांत आला आहे.

त्यानुसार, आयवेन टाऊनशिप फेज २ व ३ मौजे जांबे, नेरे व मारुंजी ता.मुळशी जि.पुणे या संस्थेच्या मौजे जांबे, नेरे व मारुंजी मधील ८१.७५ हेक्टर क्षेत्रातील विशेष नगरवसाहती मधील लोकांना घरगुती (पिण्यासाठी) २.०२१९ दलघमी पाणीवापराच्या आरक्षण प्रस्तावास शासनाने संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे. त्यानुषंगाने प्रदेश कार्यालय त्याचे खालीलप्रमाणे वाढीव आरक्षणासह एकत्रित ज्ञापन निर्गमित करीत आहे.

आयवेन टाऊनशिप फेज २ व ३ मौजे जांबे, नेरे व मारुंजी ता.मुळशी जि.पुणे या संस्थेचा स्त्रोत पवना प्रकल्प असून उदभव पवना नदी मधुन पाणी उचलण्याचे प्रस्तावीत आहे. संस्थेची पिण्यासाठी सन २०३१ ची लोकसंख्या १,३६,००० इतकी गृहीत धरुन महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण मुंबई यांचे आदेश ९/२०१७ दि.२२.०९.२०१७ नुसार पेरी अर्बन क्षेत्रासाठीचा ७० लि/दि/मा प्रमाणे निकष विचारात घेऊन पिण्यासाठी (घरगुती) एकुण ३.४७७८ दलघमीची मागणी येत आहे. त्यामध्ये २० टक्के वहनतुट धरुन ४.१६९८ दलघमी व २०% पाणी प्रक्रीया करुन पुर्नवापर करण्याचे प्रस्तावित असल्याने ते वगळून निव्वळ मागणी ३.३३५९ दलघमीची येत आहे. परंतु सदर संस्थेस यापुर्वी संदर्भीय पत्र क्र ३ अन्वये

[illegible] उद्भव [illegible] २०२१ [illegible] आरक्षण मंजूर [illegible] आहे [illegible]

[illegible] प्रकल्पाच्या मुळ नियोजनानुसार सिंचन कपातीची परिगणना करण्यात आली आहे.

प्रयोजन	निव्वळ मागणी	वहनतुट	एकुण (दलघमी)	सिंचन कपात (हे.) *
[illegible]साठी				
[illegible] मंजूर आरक्षण	१.०९८०	०.२१६	१.३१४०	७२.००
[illegible] आरक्षण	१.६८४१	०.३३७	२.०२११	१११.१३
एकुण आरक्षण	२.७८२१	०.५५३	३.३३५१	१८३.१३

* [illegible] ११ नुसार सिंचन पुनःस्थापनेचा खर्च घेण्यात यावा.

[illegible] संस्थेचे बिगर सिंचन आरक्षण खालील अटी व शर्तीनुसार मंजूर करण्यांत येत आहे.

[illegible] संस्थेस शासनाने/महामंडळाने मंजूर केलेल्या बिगर सिंचन आरक्षणाच्या शासन निर्णय / महामंडळाच्या [illegible] सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

[illegible] संस्था पाणी उचलण्याची पाणी पुरवठा योजना स्वखर्चाने कार्यान्वित करेल.

[illegible] कामास प्रत्यक्ष सुरूवात करण्यापूर्वी जलसंपदा विभागाचे संबंधित कार्यकारी अभियंता बरोबर बिगर सिंचन [illegible]साठी करारनाम्याचा प्रचलित नमुना व मार्गदर्शक तत्वे, महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग शासन [illegible] क्र. बिपापु १००२/(७२३/२००१)/सिं.व्य.(धो), दिनांक ०७/०४/२००३ व ११/०६/२००३ अन्वये निर्गमित केल्या [illegible] त्यानुसार करारनामा करावा लागेल. करारनामा केल्यानंतरच पाणी परवाना मंजुरी कार्यान्वित होईल.

[illegible] वसुली भविष्य काळात प्रभावीपणे होण्याचे दृष्टीने शासन व संबंधित संस्था यांचेमध्ये त्रिपक्षीय करार [illegible] येईल.

[illegible] आरक्षीत केलेल्या पाण्यावर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण व महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभागाच्या [illegible] ठरवुन दिलेल्या पाणीपट्टीच्या प्रचलित दरानेच पाणी पुरवठयाची आकारणी केली जाईल आणि विहित [illegible] ही पाणी आकारणी अर्जदार संस्थेने जलसंपदा विभागाकडील संबंधित कार्यालयामध्ये भरावी लागेल. [illegible] आकारणी ही एकुण वार्षीक पाणी वापरावर करण्यांत येईल. जर पाणीपटटी वेळेत भरली नाही, तर पाणी पुरवठा खंडीत करण्याचा अधिकार जलसंपदा विभागास राहिल.

[illegible] जलसंपदा विभाग जलस्त्रोत प्रदुषित करणा-या पाणी वापरकर्त्यांकडून दंडनीय पाणीपटटी आकारणी करणेबाबत मार्गदर्शक तत्वे या विषयाबाबत महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग, शासन निर्णय, क्रमांक पापव-२०१५/(प्र.क्र.८८/२०१५)/सि.व्य. (महसूल), दि.२१.०४.२०१६ मधील अटीचे पालनकरणे पाणी वापरकर्त्यावर बंधनकारक राहिल. व यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील. पाणीवापर करणारी संस्था महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे पालन करण्यास अपयशी ठरल्यास त्याचा पाणी पुरवठा बंद करण्यांत येईल.

७) संस्थेने ३ वर्षाच्या आत मंजूर पाणी आरक्षणापैकी कमीत कमी २० टक्के पुनर्वापराचे पाणी उपलब्ध करुन घेणे बंधनकारक आहे. त्यासाठी संस्थेने सांडपाणी शुध्दीकरण प्रक्रिया करणारी यंत्रणा बसवावी. तसेच याबाबतच्या सविस्तर प्रस्तावाची माहिती जलसंपदा / पर्यावरण विभागांस विहित करारनामा करतेवेळी देणे आवश्यक आहे. अन्यथा पाणी आरक्षण आपोआप रद्द होईल.

८) प्रक्रिया केलेले सांडपाणी कालव्यात/ नैसर्गिक नदी नाल्यामध्ये आल्यास अश्या पाण्याचे विनियमन महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ च्या कलम ११ (१) नुसार करण्यात यावे. अशा पाण्याच्या वापरासाठीचे दर वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेल्या दरानुसार आकारण्यात येतील.

९) ज्या जागेचा संस्थेने विकास केलेला आहे, त्या जागेतील इमारतीवरील व पेवमेंट केलेल्या मोकळया जागेवरील पावसाच्या पाण्याचे भूजल पुनर्भरण करणे (Rain water harvesting) आणि पुनर्वापराद्वारे (Recycling) अशा पाण्याचा वापर गार्डनिंग इत्यादीसाठी करण्यात यावा.

१०) ही मंजुरी म्हणजे पाणी पुरवठयाची हमी नव्हे. नैसर्गिक किंवा इतर काही अपरिहार्य कारणांमुळे तलावात पाणी कमी पडल्यास मंजूर पाणी पुरवठयाबाबत शासन जबाबदार राहणार नाही. कमी पाणी उपलब्धतेच्या वर्षात त्या वर्षापुरती मंजूर पाणी पुरवठयात कपात करण्याचा अधिकार जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंतांना राहील. परिणामी कोणत्याही प्रकारच्या नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. उदभव ठिकाणी पाण्याची कमतरता असल्यास संस्थेस आरक्षित पाण्याची शाश्वती देता येणार नाही.

[illegible] अग्रवेन टाऊनशिप फेज २ व ३ (०२/२०१८)

(54)

११) [illegible] कालव्यातील [illegible] [illegible] जबाबदार राही धरण्यात येणार नाही.

१२) संस्थेस उपलब्ध पाणी जलाशय/कालवा/नदी मधून थेट उचलावे लागेल [illegible] जॅकवेलमध्ये पंपाची व्यवस्था करावी लागेल व पाणी पुरवठ्याच तसेच [illegible] जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता यांची बांधकामापूर्वी पूर्व सहमती घ्यावी लागेल व त्यास [illegible] विभागाचे प्रचलित नियम तसेच शासन/महामंडळाने वेळोवेळी मंजूर केलेले नियम व अटी [illegible] बंधनकारक राहतील.

१३) पाणी आरक्षण मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पाणीपुरवठा हा संस्थेने जलमापन यंत्र बसविल्यानंतर दिला जाईल [illegible] आधारित अल्ट्रासोनिक प्रवाह मीटर सर्वांना बसविणे अनिवार्य आहे. जर मीटर मध्ये बिघाड/ना दुरुस्त [illegible] नसल्याचे आढळून आल्यास, जलसंपदा विभागामार्फत शेवटची तपासणी केलेल्या तारखेपासून दंडनीय दराने [illegible] आकारणी केली जाईल

१४) खाजगी संस्था/औद्योगिक संस्थेने वेगवेगळया विगतवारीसाठी एकच वॉटर मीटर बसविल्यास त्याच्या [illegible] वापरलेल्या सर्व पाण्याची आकारणी औद्योगिक दराने पाणीवापर म्हणून गृहित धरला जाईल. तथापि जर [illegible] विगतवारीप्रमाणे वेगळी वॉटर मीटर बसविण्याची व्यवस्था केली असेल तर अशा प्रत्यक्ष पाणीवापराप्रमाणे [illegible] आकारणी लागू केली जाईल.

१५) संस्थेने १ महिन्याच्या आत योजना कार्यान्वीत होण्यापूर्वी स्वखर्चाने जलमापन यंत्र बसविण्याची व्यवस्था करावी. [illegible] विहित वेळेत मीटरची व्यवस्था न केल्यास विभागीय कार्यालयाने जलमापन यंत्रणेच्या अनामत ठेव रक्कमेतून जलमापन यंत्र बसविण्याची कार्यवाही करावी. त्यासाठी कमी/अधिक रक्कम लागल्यास बिगर सिंचन देयकातून वळती करावी. प्रत्यक्ष जलमापन यंत्र बसविल्याशिवाय योजना कार्यान्वीत करण्यास परवानगी देण्यात येऊ नये.

१६) जलमापनाची व जलमापन मीटर व्यवस्था तपासण्याचा अधिकार शासनास राहील. हा व्यवस्थेवर आधारित पाणी वापराचा दैनंदिन अभिलेख संस्थेने ठेवावा हा अभिलेख शासनाचे अधिकारी केंव्हाही पाहू शकतील. हा अभिलेख न ठेवल्याचे दिसून न आल्यास प्रत्यक्षांत केलेल्या पाणी वापरासंबंधीचा अंदाज जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता ठरवतील व हा अंदाज अंतिम राहील व संस्थेवर तो बंधनकारक राहील.

१७) बारमाही कालवा उदभव असेल तर २ महिना व आठमाही कालवा उदभव असेल [illegible] महिने पाणी पुरेल एवढ्या साठवण क्षमतेचा तलाव स्वखर्चाने बांधणे आवश्यक राहील. तसेच नदी अपरिहार्य उदभव असेल तर ज्या नदी सिंचनासाठी बारमाही पाणी सोडले जाते, त्या नदीवरील पाणी पुरवठा योजनेसाठी १ महिन्याच्या गरजेएवढी साठवण क्षमता व इतर नद्याबाबत मात्र ४ महिन्यांच्या गरजेएवढी साठवण क्षमता असणारा तलाव बांधणे आवश्यक राहील तसेच कोणत्याही परिस्थितीत वरील धरणातून पाणी सोडले जाणार नाही.

१८) संस्थेने २ महिन्याची पाणीपटटी इतकी अनामत रक्कम शासनाकडे आगाऊ भरणे आवश्यक आहे. व जलमापन यंत्रासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण याच्या प्रचलित दरसुचीनुसार दर + १५% अतिरिक्त कार्यालयीन खर्च इतकी परिगणित रक्कम अनामत ठेव स्वरुपात करारनामा करतेवेळी जमा करावी.

१९) संस्थेने सिंचन कपातीपोटी, सिंचन पुन:स्थापनेचा खर्च रु.१ लक्ष प्रती हेक्टर (Base year २००१) प्रमाणे महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, यांचे परिपत्रक क्रमांक संकीर्ण २००८/(१३१/०८)/ सिंव्य(धो). दि.६.३.२००१ अन्वये व महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१३/ (४१५/२०१३) /सिंव्य(धो), दि.१६.८.२०१४ अन्वये अथवा प्रत्यक्ष करारनामा करतेवेळी लागू असलेला शासनाचा प्रचलित दर अथवा भाववाढ निर्देशांक (Cost inflation index) विचारात घेऊन यापैकी जो जास्त असेल त्या दराने, सिंचन पुनर्स्थापनेचा खर्च शासनाकडे/महामंडळाकडे करारनामा करण्यापूर्वी जमा करण्यात यावा.

परंतु, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१३/ (४१५/२०१३) /सिंव्य(धो), दि.१६.८.२०१४ नुसार ग्रामपंचायत/जिल्हा परिषद/पंचायत समित्या /नगरपालिका /कटक मंडळे (contonment board)/ नगर पंचायत या संस्था आर्थिक दृष्टा सक्षम नसल्याने त्याच्याकडून पिण्याचे पाणी आरक्षण प्रकरणात सिंचन पुनर्स्थापनेचा खर्च माफ करण्यांत आला आहे.

त्याच धर्तीवर शासन निर्णय (नगरविकास विभाग) क्रमांक संकीर्ण २०१५/प्र.क्र.२७४/नवि-३३, दि.१७.१२.२०१६ नुसार राज्यातील "क" व "ड" वर्ग महानगरपालिकांकडून आकारण्यांत येणारा सिंचन पुन:स्थापना खर्च माफ करण्यात आला आहे.

२०) प्रदेश कार्यालयाने ज्ञापन निर्गमित केल्यानंतर संस्थेस इरादपत्र (लेटर ऑफ इंटेन्ट) देण्यात यावे, त्यामध्ये सुरवातीच्या करारनामा करण्यांची मुदत ६ महिने व योजना कार्यान्वीत होण्याची मुदत ३ वर्ष [illegible]

२०१८ १२ [illegible] [illegible] २ व ३ [illegible]/२०१८ — 5/7

52

[illegible] महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग [illegible] क्रमांक [illegible] २०१८ प्र.क्र. [illegible] नियम महसूल दि. [illegible] १२.२०१८ नुसार मार्गदर्शक सूचना [illegible] आहेत. त्यानुसार वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णय / परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी.

२०) सर्व संस्थांना "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण" यांचे "पाणी पुरवठा वितरणासाठी असलेले निकष" आदेश ०१/२०१७ दि.२२.०२.२०१७ व "ठोक जलदराचे पुनर्विलोकन व सुधारणा" आदेश ०१/२०१८ दि.११.०१.२०१८ मधील सर्व अटी व शर्ती शासन आदेशानुसार लागू राहतील

२१) पाणी कमी उपलब्धतेच्या कालावधी दरम्यान, पाणी वापराच्या प्रमाणामध्ये येणारी तूट वापरकर्तांच्या भिन्न श्रेणी मध्ये विभागली जाईल. तथापि, असे करताना, घरगुती आणि औद्योगिक क्षेत्रांना जास्तीत जास्त अनुज्ञेय कपात अनुक्रमे २५% व ५०% असेल. अशाप्रकारे घरगुती ब्ल्क वॉटर यूझरर्स आणि इंडस्ट्रियल बॉल्क वॉटर यूझरर्स साठी अनुक्रमे ७५% व ५०% कमीतकमी पाणीवाटप शासनाने निर्धारित केला आहे. त्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे आदेश ३/२०१७ दि.२२.९.२०१७ मधील मुद्दा क्र.८ प्रमाणे कार्यवाही करावी.

२३) अधिनियमाच्या कलम ११ (ञ) च्या तरतुदीनुसार सर्व नगरपालिका, महानगरपालिका आणि महानगरीय शहरांसाठी जल नियोजन आणि वार्षिक लेखापरिक्षण प्रकाशित करणे प्राधिकरणाने अनिवार्य केलेले आहे. तसेच मुख्य लेखापरीक्षक, जल व जलसिंचन, महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद यांच्याकडून जललेखा परीक्षण करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत ग्राहकाची आहे. सदरचे ऑडिट रिपोर्ट जलसंपदा विभागाकडे आणि प्राधिकरणाला सादर करावा.

२४) व्यापारी संस्था/खाजगी वसाहती/नागरी वसाहती (Townships) साठी बांधकाम चालू असे पर्यंत वापरलेल्या पाण्याकरीता औद्योगिक (प्रक्रिया) दराने पाणीपट्टी आकारण्यात यावी व बांधकाम पूर्ण झाल्यावर (वापर परवाना मिळालेनंतर) होणा-या पाणीवापरासाठी ठोक जलदर आदेश १/२०१८ मधील परिच्छेद ४ नुसार पाणीपट्टी आकारणी करावी, अथवा वेळोवेळी निर्गमित होणा-या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे आदेश / शासन निर्णयानुसार आकारणी करावी. दोन्ही वापर एकाच वेळी चालू असल्यास त्यासाठी वेगवेगळे मीटर बसवावेत व त्यानुसार आकारणी करावी

२५) सदर करारनामा जास्तीत जास्त सहा वर्षासाठी वैधता राहील. करारनामा कालावधीत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांनी बनविलेले हक्क, निर्धारित अटी आणि नियम दरप्रणालीतील बदल पाणी वापरकर्ता संस्थेस बंधनकारक राहतील.

२६) करारनाम्यामध्ये मंजूर पाणी आरक्षणाचे टप्पानिहाय नियोजन समाविष्ट करावे. त्यानुसार पाणीपट्टी आकारणी करावी.

२७) सदरचे ज्ञापन हा करारनामाचा भाग राहील.

२८) कायमस्वरुपी पाणीकोटा कमी करणे, नावात बदल करणे, मुळ करारनामा नुतनीकरण करणे बाबत कार्यवाही संपूर्ण थकबाकी भरल्यानंतर करण्यात येईल.

२९) सदरचे आदेश करारनामा झाल्यापासून अंमलात येतील.

सोबत- संदर्भ क्र.२ ची प्रत

(सा. [illegible])
मुख्य अभियंता (जसं),
जलसंपदा विभाग, पुणे

प्रत: मा.सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत: मा.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत: अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

प्रत: कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

१) शासन परिपत्रक विपापु-१००१/(७१३/२००१)/सिं.व्य.(धो), दिनांक ११.०६.२००३ व ०७.०४.२००३ प्रचलित नियमानुसार बिगर सिंचन करारनामा करण्याची उचित कार्यवाही करण्यात यावी.

२) करारनामा करणेपूर्वी संस्थेकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र मिळवून ते करारनाम्यास लावावे.

३) करारनाम्याचे नूतनीकरण करणेपूर्वी शासनाचे उपरोक्त अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन होणे महत्वाचे आहे.

४) पाणी परवाने हे शासनाला महसूल मिळवून देण्याचे साधन आहे. त्यामुळे महसूल वसुलीबाबत काटेकोरपणे व सतर्क राहणे अत्यंत महत्वाचे आहे